संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १७८/२०२३
(निशाणी १ लगत )
एमएचएसआय-०५०००३९२२०२३

**फिर्यादी यांचा शपथेवर प्रोसेसपूर्व व्हेरिफिकेशन..**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नाव :-सेलेस्तीन आंतोन फर्नांडिस
वय :- ५५ वर्षे, व्यवसाय-हॉटेल
निवासस्थान-सिध्देश्वरवाडी, उभादांडा,
ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग.

मी आरोपी क्र. १ ते ८ यांच्याविरुध्द सदरची केस दाखल केली आहे. मी सदरची फिर्याद भा.दं.वि.संहिता ४९९, ५००, ५०४, ५०६, ३२३ सह कलम ३४ अन्वये दाखल केलेली आहे. मी सिध्देश्वरवाडी/सिध्दार्थवाडी येथे कायम व्यस्तव्यास असतो. त्याठिकाणी माझे घर असून सॅम ॲण्ड सॅन नावाचे हॉटेल व रिसॉर्ट आहे. पुर्वी मी टाटा मॅटालिक्स मध्ये मॅनेजरच्या पोस्टला होतो. सदरची कंपनी बंद पडल्यावर मी हॉटेल व्यवसाय सुरु केला. हॉटेल व्यवसायास लागणाऱ्या सर्व परवानग्या मी घेतलेल्या आहेत. मी माझी पत्नी व कामगारांसोबत सदर हॉटेल चालवितो. सदरचे हॉटेल मी माझ्या वडिलोपार्जित मिळकतीमध्ये चालवितो. त्यामुळे मी सर्व कायदेशीर परवानग्या घेवून हॉटेल व्यवसाय करीत आहे. तसेच मी ज्याठिकाणी हॉटेल चालवितो त्या मिळकतीमध्ये माझ्या सहहिस्सेदारांची घरे आहेत.

०२. सदर कामातील सर्व आरोपी हे आले की हॉटेलमध्ये येवून सर्व सेवासुविधांचा फायदा घेत होते. कोरोना कालावधीनंतर म्हणजेच सन २०२१ पासून माझा हॉटेल व्यवसाय व्यवस्थीत चालत आहे. त्यानंतर आरोपींनी मला मानसिकदृष्टया त्रास देण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपी यांनी माझ्याविरुध्द खोटी जाहीरात करुन मला बदनाम करण्याचा प्रयत्न केला. तसेच मी हॉटेलमध्ये अनैतिक धंदे करतो, दारु व्यवसाय करतो, अशी तक्रार आरोपी यांनी वेंगुर्ला पोलीस ठाणे येथे दिली आहे. त्याची प्रत त्यांनी पंतप्रधान कार्यालय, मंत्रालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, पालकमंत्री यांना दिलेली आहे. मी हॉटेल व्यवसायासाठी लागणारे सर्वप्रकारचे परवाने घेतलेले आहेत. तरीही आरोपी मी परवानगी घेतलेली नाही असे सांगून वेंगुर्ला पोलीस ठाणे येथे खोट्या तक्रारी करतात. तसेच माझ्याकडे येणाऱ्या गिऱ्हाईकांना ते शिवीगाळ करतात. त्यासंदर्भातील तक्रारी मी हजर केलेल्या आहेत. तसेच आरोपी गुंड घेवून आले होते जेणेकरुन फिर्यादीला त्रास होईल. सदर हॉटेल व्यवसाय माझा एकमेव व्यवसाय असून अन्य उत्पन्नाचे साधन नाही. त्यामुळे माझ्या मुलांचे शिक्षण, पालनपोषण याच व्यवसायावर अवलंबून आहे. त्यामुळे मला त्रास देण्यासाठी आरोपींचे प्रयत्न सुरु आहेत. गेली १० ते ११ वर्षे माझा हॉटेल व्यवसाय चालू आहे. सदर ५ वर्षांपुर्वी आरोपी क्र. २ लिना मास्टर्स यांनी माझ्या वडिलांशी हुज्जत घातली. त्यामुळे त्यांना ब्रेन हॅमरेज झाले व त्याच धक्कातून ते दि.०८/०५/२०२१ रोजी मयत झाले. गेल्या

डिसेंबरमध्ये त्यांनी चार बाउनसर्स आणून त्यांनी माझ्या पत्नीला जीवे मारुन टाकण्याची धमकी दिली होती. आरोपींनी 'सदर घटनेबाबत जर पोलीस स्टेशनला तक्रार दिली तर तुला जीवे मारु,' अशी धमकी दिली. आमचा व्यवसाय ही सीझनेबल आहे. तो सात महिने चालतो व पाच महिने बंद असतो. सन २०१९ पासून ते सन २०२१ पर्यंत माझा व्यवसाय पूर्णपणे बंद होता. त्यामुळे आर्थीक व्यवहार अडचणीचे झाले होते. त्यानंतर आरोपी डिसेंबर, मे महिन्यात यायचे त्यावेळेस ते नेहमीच घाणेरड्या शब्दात शिवीगाळ करायचे व येणाऱ्या प्रवाशांना त्रास देणे, त्यांच्याशी हुज्जत घालणे अशाप्रकारे त्रास द्यायचे. ज्यावेळेस ते मुंबईवरुन यायचे त्यावेळेस ते कस्टमरचे न सांगता व्हीडीओ शुटींग करायचे. आरोपी यांनी ख्रिश्चन सोसायटीमध्ये माझी बदनामी केली आहे. तसेच आरोपींनी मी जमीन मिळकत हडप केली आहे व मी बेकायदेशीर धंदा करतो असे ते प्रत्येक खात्यात जावून सांगत असतात जेणे करुन माझी बदनामी व्हावी. आरोपी हे कायमस्वरुपी मुंबई येथे वास्तव्यास असतात. ते येथे वास्तव्यास नाहीत. ते येथे येवून आमच्या हॉटेल व्यवसायास त्रास होईल यासाठी प्रयत्नात असतात. आरोपी तीन वर्षांपुर्वी माझ्या हॉटेलमध्ये येवून खाणेपिणे करायचे. त्यावेळेस त्यांना कोणताही त्रास झाला नव्हता. तसेच ते जेव्हा इकडे यायचे तेव्हा दारु पिवून दंगा करायचे. आरोपींकडे आर्थीक व मनुष्यबळ भरपूर त्यामुळे ते मला त्रास देतात. त्यामुळे मला व माझ्या कुटुंबाला मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झाला आहे. आरोपींच्या वागणूकीमुळे मला त्रास सहन करावा लागत आहे. तसेच आरोपींमुळे माझी जी काही अब्रू नुकसानी व व्यवसायाची हानी झालेली आहे, त्यामुळे मी सदरची फिर्याद न्यायालयात दाखल केली आहे. मला न्याय मिळावा, आरोपींना शासन व्हावे ही विनंती.

.................

फिर्यादीची सही

माझे समक्ष,

(डी.वाय.रायरीकर)

न्यायदंडाधिकारी वर्ग-१, वेंगुर्ला.

दिनांक:- २८/०६/२०२४.